(१) ५८

शासन निर्णय क्रमांक-पीओएस-१०९३/प्र.क्र.१२७/स्वासैकक्ष, दिनांक ४ जुलै, १९९५ नुसार शासनास सादर करावयाच्या स्वातंत्र्य सैनिकांच्या कागदपत्रांची पूर्तता करणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक-पीओएस-१०९३/प्र.क्र.१२७/स्वासैकक्ष,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक: ३० सप्टेंबर, १९९५

शासन निर्णय क्रमांक-पीओएस/१०९३/प्र.क्र.१२७/स्वा.सै.क., दिनांक ४ जुलै, १९९५ अन्वये सर्वोच्च न्यायालयाने व त्या अनुषंगाने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या निकालाच्या अनुषंगाने सन्मान पेन्शनसाठी स्वातंत्र्य सैनिकांनी करावयाच्या अर्जावर वेळेच्या मर्यादेचे बंधन न घालता पुराव्यांच्या आधारावर अर्ज विचारात घ्यावेत व त्याप्रमाणे त्यावर गुणवत्तेनुसार विचार होऊन निर्णय घेण्यात यावा असे आदेश जारी करण्यात आले आहेत.

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, बहुतांशी प्रकरणांमध्ये शासनाने विहित केलेल्या निकषानुसार कागदपत्रांची पूर्तता न होता जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयाकडून प्रकरणे शासनाच्या विचारार्थ पाठविण्यात आलेली आहेत. यामुळे शासन स्तरावर प्रकरणे प्रलंबित राहिलेली आहेत. तसेच त्यामुळे अनावश्यक पत्रव्यवहारही वाढलेला आहे. स्वातंत्र्य सैनिकांच्या अर्जावर जलद निपटारा करण्याच्या दृष्टीकोनातून जिल्हाधिकाऱ्यांकडून येणाऱ्या प्रकरणांची खालीलप्रमाणे पूर्तता होणे आवश्यक आहे.

१] अर्जदाराकडून विहित नमुन्यात अर्ज व त्यासोबतच्या प्रपत्रातील माहिती सुस्पष्ट भरून घेणे व सर्व मूळ कागदपत्र त्यांच्या दोन साक्षांकित झेरॉक्स प्रतींसह शासनाकडे जिल्हाधिकाऱ्यांच्या शिफारशीसह पाठविणे.

२] जिल्हाधिकाऱ्यांच्या पत्रामध्येसुध्दा सुस्पष्टरित्या शिफारस करण्यात येत आहे किंवा नामंजूर करण्यात येत आहे याबद्दल उल्लेख असावा.

३] जिल्हा गौरव समितीच्या अध्यक्ष/सदस्यांची नावे त्यांच्या सह्यांखाली टंकलिखित करावीत व ती निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांनी साक्षांकित करावीत.

४] १९८७ पासून प्रलंबित प्रकरणांचा जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ आढावा घ्यावा व त्यापैकी जी प्रकरणे नवीन निकषामध्ये बसत नसतील त्यांच्याबाबत वरीलप्रमाणे कागदपत्र तयार करून शासनाच्या विचारार्थ ही प्रकरणे विनाविलंब सादर करावीत.

[कृ.मा.प.]

५] जिल्हाधिकाऱ्यांच्या स्तरावर स्वातंत्र्य सैनिकांची माहिती एकत्रित करण्यासाठी एन.आय.सी.ने जे पॅकेज तयार करुन दिले होते त्याचा उपयोग करुन प्रलंबित प्रकरणे लवकर निकाली काढण्याबद्दल कार्यवाही करावी.

६] जिल्ह्यामध्ये एकूण किती स्वातंत्र्य सैनिकांची प्रकरणे प्रलंबित आहेत व त्यांचे प्रकार या बद्दलची माहिती शासनास सादर करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ अंकेला फातरपेकर ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१] सर्व विभागीय आयुक्त,
२] सर्व जिल्हाधिकारी,
३] मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४] सभापती, स्वातंत्र्य सैनिक उत्तराधिकार समिती यांचे स्वीय सहाय्यक यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी व माहितीसाठी.
५] सदस्य सचिव, स्वातंत्र्य सैनिक उत्तराधिकार समिती यांचे स्वीय सहाय्यक यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी व माहितीसाठी,
६] कक्ष अधिकारी श्री. फिलिप, स्वातंत्र्य सैनिक कक्ष,
७] कक्ष अधिकारी, श्रीमती चोरकर, स्वातंत्र्य सैनिक कक्ष,
८] निवड नस्ती [२ प्रती].